**नि.फौ.ख.क्रं. २३०/२०२४**
**शासन वि. राजेंद्र**
**नि.क्र. ७६/क**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ६ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | विकास मधुकरराव जाधव |
| वय | : | ३९ वर्षे |
| व्यवसाय | : | पो. ह. ब.नं. २४ |
| राहणार | : | पोलीस स्टेशन आष्टी. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एम. दारुणकर यांचेमार्फत**

१. मी २०२३ साली पोलीस नाईक म्हणून आष्टी पोलिस स्टेशन ला नेमणूकीस होतो. गु.र नं. ५२४/२०२३ कलम ३२४, ३२३ व इतर भादवी प्रमाणे गुन्हा नोंदवल्यानंतर तपास वरिष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे आला. नि. ५९ फिर्यादवर त्याबाबत आदेश नमुद आहे. मला तपासाकामी प्रथम खबरी अहवाल, फिर्याद, व इतर कागदपत्रे मिळाली. गुन्हयाचा घटनेचा प्राथमिक अहवाल मिळाला, साक्षीदारास अहवाल दाखवला. त्यावर पो.उप. नि. चाटे यांची सही आहे. ती मी ओळखतो व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर अहवालास **नि. पी.७७/पी.डब्ल्यु. ६** देण्यात येते. मी २ पंचाना घेवुन यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि. ६५ केला. आता साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर दोन पंचाची व माझी सही आहे. सदर पंचनाम्याद्वारे घटनास्थळावरुन दगड **एम.ओ. १** जप्त केला. साक्षीदारास मुद्देमाल दगड दाखवण्यात आला. तो मुद्देमाल तोच आहे. मुद्देमालाच्या लेबलवर माझी व पंचाची सही आहे. त्याची मुद्देमाल पावती दोषारोपपत्रासह दाखल केली.

२. त्यानंतर साक्षीदाराचे तपास टिपण त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले व त्यावर माझी सही आहे. आरोपीस फौ.प्र.सं. ४१–अ प्रमाणे नोटीस दिली त्यावर माझी व आरोपींची सही आहे. साक्षीदारास सदर नोटीसा दाखवल्या त्यावर माझी व आरोपींची सही आहे. ३ नोटीस प्रतिला अनुक्रमे **नि. ७८ ते ८०** देण्यात येते. त्यांचे चेहरेपट्टी फॉर्म भरुन घेतले. सरकारी दवाखाना कडा येथे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी पत्र दिले. साक्षीदारास नि. ७२ वरील पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यानुसार वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले. आरोपींना कलम १७० प्रमाणे नोटीस दिली. सदर नोटीसा साक्षीदारास दाखवल्या. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास अनुक्रमे **नि. ८१ व ८२** देण्यात येते. आरोपी विरुध्द तपासाअंती फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केल्याचे निष्पन्न झाला. आरोपीचे विरुध्द सबळ पुरावे मिळून आलेने त्यांचे विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस पाहिलेस ओळखू शकतो. आरोपी क्र. १ व २ न्यायालयात हजर आहे. नि. ७५ नुसार आरोपी क्र. ३ ते ६ यांची हजेरीमाफी ओळख न नाकारण्याच्या अटीसह मंजुर.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.एच. शेकडे यांचे मार्फेत उलटतपास**

३. कडा ते शिराळ १२ कि.मी. अंतर असुन सदर रस्ता डांबरी आहे. दि. ०३/१२/२०२३ रोजी मी तपासकामी सरकारी दवाखाना आष्टी येथे गेलो होतो. शिराळवरुन कड्याला जाण्यासाठी २०–२५ मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, मदने वस्ती शिराळ गावापासुन २ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मदने वस्तीवर हाकेच्या अंतरावर १५–२० घरे आहेत. तपासात आरोपी व फिर्यादीच्या पुर्वीच्या वादाबाबत काही निष्पन्न झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, हनुमंतगाव– शिराळ रस्त्यावर रस्त्यालगत फिर्यादी व आरोपींचे घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपीची घरे लागुन असुन त्यामध्ये केवळ एक भिंत आहे. फिर्यादीच्या शेजारील वस्तीवरील खंडु मदने, आबासाहेब मदने, अंबादास मदने, विठ्ठल मदने, सोनाजी मदने व रावसाहेब मदने यांच्याकडे तपासकामी चौकशी केली नाही.

४. पंच अशोक श्रीराम मदने हे फिर्यादीचे पती बाळासाहेब यांचे काका असलेबाबत माहिती नाही. अमान्य की, पंच फिर्यादीच्या सांगण्यावरुन घेतले. अमान्य की, पंचनामा करुन दगड जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, नि. ६५ वरील पंचनाम्यावर खोटा नकाशा तयार केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाच्या विरोधी गुन्हा क्र. ५२७/२०२३ चा तपास देखील मी केलेला आहे. अमान्य की, दोन्ही घटनेतील घटनास्थळ व पंचनामा वेगवेगळे आहेत. अमान्य की, तपासटिप्पन फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. अमान्य की, जखमा कशामुळे झाल्या याबाबत गुन्हयाचा सखोल तपास केला नाही. अमान्य की, फिर्यादीचे म्हणणे गृहीत धरुन खोटा तपास केला. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०३/१२/२०२३ रोजी फिर्यादीने आरोपींना मारहाण केलेबाबत तपासामध्ये घटना निष्पन्न झाली. अमान्य की, तपासात आरोपींनी फिर्यादीस मारहाण केल्याचे निष्पन्न झाले नाही. अमान्य की, तपासामध्ये आरोपी विरुध्द पुरावा मिळुन आला नाही. अमान्य की, मुद्देमाल दगड तपासात जप्त केला नाही. अमान्य की, सरतपासात मी खोटे सांगीतले आहे. अमान्य की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. –फेरतपास नाही.**

दि. ३०.०३.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.04.01 12:28:05 +0530

श्री.एम.आर.बडाख
३ रे न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, आष्टी